# प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत भारत सरकार आणि महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे अनुमोदित एचडीएफसी एर्गो जनरल इन्शूरन्स कंपनी सादर करीत आहे

## पुनर्रचित हवामानावर आधारित फळ पिक विमा योजना (RWBCIS) मृग बहार - सन 2020

HDFC ERGO

Take it easy!

## सुरक्षित शेतकरी ! देशाचा अभिमान !

**सुरक्षित करा तुमचे पीक, समृद्धशाली करा तुमचे भविष्य एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी सोबत**








### ह्या योजनेची उदिष्टे :-

- नैसर्गिक आपत्ती व हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे.
- पिकाच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्याचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे.
- शेतकऱ्यांना नाविण्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे.

### ह्या योजनेचा कोणाला फायदा होऊ शकतो:-

- अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित फळपिकासाठी खातेदार शेतकऱ्यांसह कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत.
- सदर योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी ऐच्छिक करण्यात आली आहे.
- प्रधानमंत्री पीक विमा व फळपिक विमा योजनेत कर्जदार शेतकर्यांचा सहभाग ऐच्छिक असून योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास सहभागी न होणे बाबत घोषणापत्र योजनेतील सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस अगोदर कर्ज मंजूर केलेल्या बँकेत देणे आवश्यक आहे. म्हणजे बँक विमा हप्ता कपात करणार नाही.
- एका शेतकऱ्यास अधिसूचित फळपिकासाठी जास्तीत जास्त 4 हे. क्षेत्र पर्यंत विमा संरक्षण घेऊ शकतो तसेच संत्रा, मोसंबी, डाळिंब या फळपिकासाठी एका वर्षात एकाच हंगामा करिता विमा संरक्षण घेता येईल.
- शेतकऱ्यावरील विमा हप्ताचा भार कमी करण्यासाठी शेतकऱ्याने भरावयाचा विमा हप्ता 5 टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे.

### ह्या योजनेत समाविष्ट करण्यात येणारी हवामान धोके:-

- पाऊस - कमी पाऊस, जास्त पाऊस, पावसाचा खंड.
- तापमान - कमी तापमान, जास्त तापमान.
- साक्षेप आर्द्रता
- ह्या पैकी 2-3 घटक एकत्रितपणे

### ह्या योजनेत सहभागी होण्यासाठी लागणारे कागदपत्रे

- आधारकार्ड (बंधनकारक)
- 7/12 / जमिनीचा ताबा सिद्ध करणारे प्रमाणपत्र
- संपूर्ण भरलेले विमा प्रस्ताव पत्र
- स्वयं घोषणापत्र / पेरणी प्रमाणपत्र
- बँक पासबुक किंवा रद्द केलेला धनादेश
- जीईओ - टॅग (GEO Tagged) केलेल्या फळांच्या पिकाचे छायाचित्र
- भाडेतत्वावरील शेतीचे करारपत्र

### दाव्याचे मूल्यमापन आणि समझोता:-

महाराष्ट्र सरकार आणि भारत सरकार द्वारा लागू केलेल्या पुनर्रचित हवामानावर आधारित फळ पिक विमा योजना अंतर्गत अधिसूचित संदर्भ हवामान केंद्राद्वारा अधिसूचित करण्यात आलेल्या हवामानाच्या माहितीनुसार दाव्याचे मूल्यमापन करण्यात येईल आणि संपूर्ण पॉलिसी कालावधीसाठी प्रमाणित हवामानाची माहिती प्राप्त झाल्यानंतर आणि राज्य व केंद्र सरकारकडून अनुदान मिळाल्यानंतर दाव्याची प्रक्रिया सुरु होईल.

सर्व पॉलिसीच्या दाव्याचे पिकानुसार आणि हवामान केंद्रानुसार राज्य सरकारने अधिसूचित केलेल्या नियम पत्रकानुसार मूल्यमापन करण्यात येईल.

हवामानाच्या प्रतिकूल परिस्थितीत अधिसूचित महसूल मंडळ मध्ये अधिसूचित पिकाची लागवड करणाऱ्या सर्व विमाधारक शेतकऱ्याचे प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीमुळे सारखेच नुकसान झाले आणि सारख्याच प्रमाणात पिकाचे नुकसान असे समजण्यात येईल आणि एकाच दराने दाव्यास पात्र होतील

## अधिसूचित जिल्हे:

| अधिसूचित फळपिक | नोंदणीची शेवटची तारीख | अधिसूचित जिल्हे |
|---|---|---|
| पेरू | 20 जून 2020 | अहमदनगर, जालना, नाशिक, परभणी |
| लिंबू | 20 जून 2020 | अहमदनगर, अमरावती, जालना, लातूर, नाशिक, परभणी, वाशिम |
| संत्रा | 20 जून 2020 | अहमदनगर, अमरावती, जालना, परभणी, वाशिम, यवतमाळ |
| डाळिंब | 14 जुलै 2020 | अहमदनगर, अमरावती, जालना, लातूर, नाशिक, परभणी, सातारा, वाशिम |
| चिकू | 30 जून 2020 | अहमदनगर, जालना, नाशिक, परभणी |
| मोसंबी | 30 जून 2020 | अहमदनगर, अमरावती, जालना, परभणी, यवतमाळ |

## पीकनिहाय विमा संरक्षित रक्कम आणि विमा हप्ता:-

| अधिसूचित फळपिक | विमा संरक्षित रक्कम (रू./हेक्टर) | शेतकऱ्याचा हिस्सा विमा दर (टक्केवारीत) | शेतकरी हिस्सा विमा हप्ता (रु./हेक्टर) |
|---|---|---|---|
| पेरू | 60000 | 5% | 3000 |
| लिंबू | 70000 | 5% | 3500 |
| संत्रा | 80000 | 5% | 4000 |
| डाळिंब | 130000 | 5% | 6500 |
| चिकू | 60000 | 5% | 3000 |
| मोसंबी | 80000 | 5% | 4000 |

ईमेल: pmfby.maharashtra@hdfcergo.com

योजनेसंबंधी अधिक माहिती मिळविण्यासाठी, कृपया संपर्क साधा:
टोल फ्री क्रमांक: 1800 2660 700

कर्जदार नसलेले शेतकरी जवळच्या वित्तीय संस्थेमार्फत उदा. राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, प्राथमिक कृषि सहकारी सोसायटी (पीएसीएस), प्रादेशिक ग्रामिण बँका/विमा मध्यस्थ/सामायिक सेवा केन्द्र (सीएससी)/ https://pmfby.gov.in/farmerLogin वेबसाईटच्या लिंकमार्फत स्वत: नोंदणी करणे, अशा प्रकारे त्यांच्या स्वत:च्या पिकाची नोंदणी करू शकतात.

एचडीएफसी एर्गो जनरल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड. आयआरडीएआय नोंदणी क्र.146. सीआयएन: U66030MH2007PLC177117. नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय: 1ला मजला, एचडीएफसी हाऊस, 165-166, बॅकबे रिक्लेमेशन, एच्. टी. पारेख मार्ग, चर्चगेट, मुंबई-400 020. जोखमींचे घटक, नियम व अटी, यासंबंधी अधिक माहितीसाठी, कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी विक्रीची माहितीपुस्तिका /प्रॉस्पेक्टस पाचा. वर दर्शविलेला ट्रेड लोगो एचडीएफसी लिमिटेड आणि एर्गो इंटरनॅशनल एजी यांच्या मालकीचा आहे आणि कंपनीने त्याचा परवान्याच्या अंतर्गत उपयोग केला आहे. UIN:CSC-Restructured Weather Based Crop Insurance Scheme - HDE-AG-P18-26-V01-17-18 | Restructured Weather based Crop Insurance Scheme - IRDAN125P0005V01201617. UID:4497.